सत्र खटला क्र. २८/२०२५.
सरकार –वि– अनिल सवडे
निशाणी क्र. ६२.

सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. १० यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | – | सुरेश शेषराव मांटे |
| वय | – | ५६ वर्षे. |
| व्यवसाय | – | पोलीस उपनिरीक्षक, पो.स्टे. देउळगांव राजा. |

सरतपास सरकारी वकील श्री. वसंत एल. भटकर यांचे मार्फत–

०१. दि. ०३.११.२०२४ रोजी मी पो.स्टे. देउळगांव राजा येथे पोलीस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत होतो. दि. २९.१०.२०२४ रोजी मला हवालदार माधव कुटे यांचेकडून माहीती मिळाली की चिखली कुंभारी बायपास शिवारामध्ये एक प्रेत पडले आहे. माहीती मिळाल्यानंतर मी स्टेशन डायरीला नोंद घेवून घटनास्थळी रवाना झालो. घटनास्थळ हा चिखली कुंभारी बायपास रोडच्या पलीकडे उत्तर दिशेला आहे. त्याठिकाणी मी एक पुरुष जातीचे प्रेत चित्त अवस्थेत पडलेले पाहिले. थोडया वेळाने, मयताचे वडील तेथे आल्याने मला समजले की ते प्रेत एका रामेश्वर सवडे याचे आहे. त्यानंतर मी दोन पंचाना बोलावून त्याचे समक्ष तेथे घटनास्थळ पंचनामा केला. घटनास्थळ पंचनामा नि.क्र. ४० मला दाखविण्यात आला. त्यावर माझी व दोन पंचाच्या सहया आहेत. त्यातील मजकुर खरा असून बरोबर आहे. त्यानंतर मी मयताचा नि.क्र. ४४ प्रमाणे मरणोत्तर पंचनामा केला. तो पंचनामा मला दाखविण्यात आला. त्यावर माझी तसेच दोन पंचाच्या सहया आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यानंतर मी तो देह मी शवविच्छेदनासाठी पो.कॉ. देवानंद पालवे यांना डयुटी पास देवून वैदयकिय अधिकारी देउळगांव राजा यांच्याकडे पाठविले. तो डयुटी पास मला दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास नि.क्र.६३ देण्यात येतो. त्यानंतर मी प्राथमीक तपास करुन वरीष्ठाच्या आदेशान्वये पुढील तपास पोउनि. श्री. चिरडे याचेकडे सुपुर्त केला.

उलटतपास आरोपीतर्फे श्री. एन. बी. साखरे यांच्या मार्फत –

०२. हे खरे आहे की प्राथमिकरित्या मर्ग तपास करते वेळेस मला प्रस्तुत आरोपी विरुध्द कोणताही पुरावा मिळुन आला नव्हता. हे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण. फेरतपास काही नाही.

वा.दा.ब. अ.क.क.

समक्ष

Digitally signed by ASHOK GURUDASMAL SANTANI
Date: 2026.02.04 17:25:53 +0530

(ए. जी. संतानी)
जिल्हा न्यायाधीश क्र. ३, बुलडाणा
दिनांक : ०४/०२/२०२६.

(ए. जी. संतानी)
जिल्हा न्यायाधीश क्र. ३
बुलडाणा